• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३४५ • रविवार,दि. १७ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 345 • Sunday 17 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955



## बीड लोकसभेत ज्योती मेटेंचं पंकजा मुंडेंना तगडं आव्हानं?

**बीड । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी भाजपाने दुसरी यादी जाहीर करत, महाराष्ट्रातील २० उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. त्यामध्ये, यंदा बीडमधून प्रीतम मुंडेंचं तिकीट कापण्यात आलं असून पंकजा मुंडेंना लोकसभेच्या मैदानात उतरवलं आहे. त्यामुळे, आता महाविकास आघाडीकडून बीडमधील उमेदवार कोण असणार, याची चर्चा निवडणुकांच्या राजकीय वर्तुळात होत आहे. त्या अनुषंगाने महाविकास आघाडीने राजकीय डाव टाकल्याचं दिसून येत आहे. दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटेंना बीडच्या मैदानात उतरवण्याची चर्चा सुरू आहे. बीडमध्ये पंकजा मुंडेंच्या उमेदवारीला बळ मिळालं आहे. स्वत: पंकजा मुंडेंनी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर धनंजय मुंडे आमच्यासोबत असल्याने आता अधिक मतांनी विजयी होऊ, असा विश्वास व्यक्त केला. मात्र, महाविकास आघाडीकडून ज्योती मेटे यांना उमेदवारी देण्याच्या हालचाली सुरू असल्याचे समजते. पंकजा मुंडेंना महाविकास आघाडीकडून तगडा महिला उमेदवार मैदानात उतरवला जाण्याची शक्यता दिसून येते. ज्योती मेटे ह्या विनायक मेटे यांच्या पत्नी आहेत. ज्योती मेटेंना विधानपरिषदेवर घेण्यात यावे, अशी मागणीही शिवसंग्राम संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केली होती. ज्योती मेटेंनी शिवसंग्रामचं नेतृत्त्व करावं, अशी इच्छाही कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली होती. डॉ. ज्योती मेटे या नाशिक येथे धर्मादाय कार्यालयात सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. सातत्याने कार्यकर्त्यांच्या संपर्कात आहेत. आता त्यांना बीड लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## रेशनच्या तांदळातून शासनाला कोट्यावधीचे नुकसान -अॅड.अजित देशमूख

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हात मागील काही वर्षापासुन विदर्भातील गोंदिया किंवा भंडारा जिल्हयातून सी.एम.आर. तांदुळ उचल करण्यासाठी देण्यात येतो. तांदुळ साडे सहाशे कि. मी. इतक्या जास्त अंतरावरून आणावा लागत असल्याने वाढीव अंतर होऊन त्यांचा शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडतो. मात्र पुरवठा खात्याच्या मंत्र्याला याचे गांभीर्य नाही. त्यांनी आणि प्रशासनाने शासनाला कोट्यावधी रुपयांच्या वाहतूक खर्चाला खड्ड्यात घातले असल्याचा आरोप जन आंदोलनाचे विश्वस्त अॅड. अजित एम. देशमुख यांनी केला. दरम्यान राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर यांनी या गंभीर प्रकाराची दखल घेतली असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे. गोंदिया व भंडारा येथून बीड जिल्ह्याचे अंतर जवळ-जवळ ६२५ ते ६५० कि.मी. इतके आहे. तसेच बीड जिल्हयातील बेस डेपो हे सरासरी ६५ ते ७० कि.मी. अंतरावर आहेत. त्यामुळे एकुणच अतिशय लांबचे अंतरावरून धान्याची वाहतुक करावी लागत असल्याचे दिसून येते. बीड जिल्हयाकरिता परळी व अहमदनगर हे बेस डेपो ठरलेले आहेत. व त्या ठिकाणी धान्य उपलब्ध असताना देखील वाहतुक ठेकेदाराला जास्तीचे पैसे मिळावेत, ह्या उद्देशाने सदरील तांदुळ जास्तीच्या अंतरावरून देण्यात येतो, असे स्पष्ट पणे दिसते. गोर गरिब धान्यापासून वंचित राहु नयेत, ह्याकरिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम तयार करण्यात आला. शासन निर्णयातील तरतुदी नुसार जवळच्या बेस डेपो मधुन अन्न धान्य उपलब्ध करून देणे ही जबाबदारी आहे. या व्यक्तिरिक्त जर अन्न महामंडळाने असे धान्य उपलब्ध करून दिले नाही, तर होणाऱ्या वाहतूक खर्चाची जबाबदारी ही अन्न महामंडळाची असते. परंतु या प्रकरणामध्ये शासन स्तरावरून काही विशिष्ट जिल्हया करिता हा तांदुळ संगनमताने देण्यात येतो, असे आढळून येते. गोंदिया अथवा भंडारा जिल्हयाच्या जवळच्या जिल्हया व्यक्तिरित तांदुळ देणे, हे शासनाच्या पैशाचे नुकसान केल्या सारखे आहे. शासनाचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कटाक्षाने बीड जिल्ह्याकरिता जवळच्याच बेस डेपोमधून धान्य उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच गोंदिया अथवा भंडारा येथून सी. एम.आर. तांदुळ देण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान या प्रकारात मुख्य सचिवांनी लक्ष घालावे. पुरवठा मंत्र्यांच्या कारभारावर आपला अजिबात विश्वास नाही, असे त्यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे मुख्य सचिवांनी अॅड. देशमुख यांचे हे निवेदन पुरवठा विभागाच्या सचिवांना पाठवून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. यापूर्वी देखील पुरवठा यंत्रणा आपण चांगल्या प्रकारे हाताळली असून शासनाचे कोट्यावधी रुपये वाचवले आहेत. असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान जिल्हा प्रशासन झोपल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

### महाराष्ट्रात पाच टप्प्यात निवडणुका

**मुंबई । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता जाहीर झाली आहे. निवडणूक आयोगाने शनिवारी दुपारी ३ वाजता पत्रकार परिषद घेऊन निवडणुकांची घोषणा केली. पहिला टप्पा - शुक्रवार, दि. १९ एप्रिल - रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदीया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर, दुसरा टप्पा - शुक्रवार, दि. २६ एप्रिल - बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ - वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी, तिसरा टप्पा - मंगळवार, दि. ७ मे - रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी- सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले, चौथा टप्पा - सोमवार, दि. १३ मे - नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, बीड, पाचवा टप्पा- सोमवार, दि. २० मे - धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, ईशान्य मुंबई, उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई आयोजित पत्रकार परिषदेमध्ये निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं.

## लातूर लोकसभा निवडणूक चुरशीची?

**लातूर । प्रतिनिधी**

एकेकाळी देशमुख, चाकूरकर आणि निलंगेकर यांच्यासारख्या मातब्बर काँग्रेस नेत्यांचा जिल्हा म्हणून लातूरची ओळख होती. १९७७ ला उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाचं विभाजन झालं आणि लातूर लोकसभा मतदारसंघ निर्माण झाला. पुढे माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी ५ ऑगस्ट १९८२ ला स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती केली आणि मागच्या २८ वर्षांमध्ये लातूरने स्वतःची एक स्वतंत्र ओळख बनवली आहे. शिक्षणातला 'लातूर पॅटर्न' राज्यभर प्रसिद्ध असला तरी दुष्काळात ट्रेनने पाणी आणावा लागलेला जिल्हा म्हणूनही लातूरला ओळखलं जातं. मांजरा नदीच्या खोऱ्यातल्या या जिल्ह्यात पाऊस तसा जेमतेमच पडतो, जवळपास दरवर्षी या जिल्हयावर दुष्काळाचं सावट घोंगावत असतं पण राजकारणाच्या बाबतीत मात्र लातूर हा अत्यंत सुपीक जिल्हा म्हणून ओळखला जातो. लातूरने महाराष्ट्राला दोन मुख्यमंत्री आणि एक मातब्बर केंद्रीय मंत्री दिले आहेत. कधीकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्यात या तीनही मातब्बर नेत्यांना मतदारांनी पराभवाची धूळ देखील चाखायला लावली आहे. त्यामुळे लातूरच्या मतदारांकडे 'राजकीय बॅलन्स' साधण्याचं एक उत्तम कसब आहे. मुख्यमंत्री राहिलेल्या देशमुखाचा, निलंगेकरांचा आणि देशाचे गृहमंत्री राहिलेल्या शिवराज पाटील चाकूरकरांचा पराभव करण्याची किमया लातूरच्या मतदारांनी साधली आहे. एकेकाळी काँग्रेसला साथ देणाऱ्या या जिल्ह्यात मागच्या दहा वर्षांपासून मात्र काँग्रेसचा खासदार निवडून येऊ शकलेला नाही. विलासराव देशमुखांच्या मृत्यूनंतर दोन विधानसभा वगळता काँग्रेसला फारसं काहीही करता आलेलं नाही. लातूर आणि शेजारच्या जिल्ह्यातील काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी भाजपवासी होण्याचा निर्णय घेतलेला आहे. लातूरचे आमदार आणि माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा होती. पण एका कार्यक्रमात स्वतः देशमुख यांनी मी कुठेही जाणार नसल्याची घोषणा केली आहे.

## लोकसभा निवडणूकीत पंकजा मुंडेंच्या विरोधात दिग्गज उमेदवार



**बीड । प्रतिनिधी**

भाजपच्या लोकसभा उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत महाराष्ट्रातून अनपेक्षित नावं पहायला मिळाली. भाजपने जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत महाराष्ट्रातील २० जागेवर उमेदवारांची घोषणा करण्यात आली. बीडमधून पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने तिकीट तर दिले पण निडणुक जिंकायची कशी? अशी स्थिती पंकजा मुंडे
यांच्यासमोर निर्माण होऊ शकते. कारण, लोकसभेच्या मैदानात पंकजा मुंडे यांच्या विरोधात नवे आव्हान उभे राहिले आहे. बीडमध्ये यशवंत सेना पंकजा मुंडे यांच्या विरोधात लोकसभेच्या मैदानात उतरणार आहे. वेगवेगळ्या पक्षाकडून धनगर समाजाला केवळ आश्वासनांची खैरात वाटली जात आहे. प्रत्यक्षात कुठलाही लाभ दिला जात नाही. आरक्षण प्रश्नानंतर धनगर समाजाच्या विकासाचा प्रश्न देखील प्रलंबित असून याच प्रश्नावर बीड लोकसभेच्या मैदानात यशवंत सेनेचा उमेदवार उतरवण्याचा निर्धार बीड मधील बैठकीत करण्यात आला आहे. पंकजा मुंडे यांनी धनगर समाजाच्या गावाला निधी दिला नाही. खासदार फंड तर आम्हाला माहीतच नाही त्यामुळे आता या लोकसभा निवडणुकीत आम्ही त्यांच्या विरोधात उतरत असल्याचे धनगर समाज बांधवांनी म्हटले आहे. यशवंत सेनेचे नेते दोडतले यांनी निवडणूक लढवावी असा देखील निर्णय झालेला आहे. भाजपाकडून खासदार राहिलेल्या डॉक्टर प्रीतम मुंडे यांना तिसऱ्यांदा भाजप लोकसभेच्या रणांगणात उतरवणार की पंकजा मुंडे यांना भाजप दिल्लीला पाठवणार? याची चर्चा बीडमध्ये सुरु होती. अखेरीस भाजपने धक्कातंत्राचा वापर करत प्रीतम मुंडे यांच्या ऐवजी पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत यांच्याकडून पराभूत झाल्यानंतर पंकजा मुंडे यांचा राजकीय प्रवास खडतर झाला होता. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पंकजा मुंडेंवर भाजप पक्षाकडून कोणतीही मोठी जबाबदारी सोपवण्यात आलेली नव्हती. अखेरीस भाजपने पंकजा मुंडे यांना लोकसभेचे तिकीट दिले आहे.



## मतदार संघाच्या विकासासाठी कामदार आ.नमिता मुंदडा सदैव तत्पर

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुंबेफळ येथील श्री क्षेत्र सिद्धिविनायक देवस्थान विकास आणि भाविक भक्तांच्या निवासस्थानासाठी राज्याच्या ग्रामविकास विभागाकडून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी प्रयत्नपूर्वक निधी आणून कुंबेफळ ग्रामस्थांना दिलेल्या वचनाची पूर्ती केली आहे. कुंबेफळ येथील सुप्रसिद्ध श्री सिद्धिविनायक देवस्थानाची जागृत देवस्थान म्हणून ख्याती आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांचा संख्या मोठ्या प्रमाणात आहे. वरचेवर वाढणाऱ्या भाविकांच्या संख्येला सुविधा पुरविण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे या देवस्थानचा विकास करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती. त्यावर आ. नमिता मुंदडा यांनी या देवस्थान विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचा शब्द ग्रामस्थांना दिला होता आणि तशी मागणी देखील राज्य शासनाकडे केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून राज्य शासनाने ग्राम विकास विभागामार्फत ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत कुंबेफळ येथील श्री सिद्धिविनायक देवस्थानासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र भक्त निवास, सभामंडप बांधकाम आदी कामे करण्यात येणार आहेत. या जागृत देवस्थानच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मंत्रीमंडळाचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

संपादकीय

## भाजप-भ्रष्टाचार

इतर सर्वच पक्षांतील भ्रष्ट लोकांना भाजपने आपल्या वॉशिंग मशीनमध्ये टाकले. पण इलेक्टोरल बॉण्डस्च्या भयंकर घोटाळ्याचे प्रायश्चित्त मोदी-शहा कसे घेणार? उद्योगपतींना कंत्राटे दिली, सरकारी कंपन्या विकल्या तो विषय वेगळा. देणग्या घेतल्या तो विषय वेगळा. दोघांचा काहीही संबंध नाही असे आता भाजपकडून बेशरमपणे सांगितले जाईल. ज्यांनी शेकडो कोटींच्या देणग्या भाजपला दिल्या ते ठेकेदार, उद्योगपती म्हणजे कर्णाचे अवतार नाहीत. कौरव या शब्दात जो वाईट अर्थ भरलेला असेल तो सर्वार्थ ज्यांच्या बाबतीत लागू पडू शकेल असे हे पंतप्रधान व त्यांचे देणगीदार. भ्रष्टाचार करणारे व भ्रष्टाचाराला पाठिंबा देणाऱ्यांची फौजच पंतप्रधान मोदी यांनी निर्माण केली. या फौजेने देश लुटला, सत्य सांगणाऱ्यांना धमक्या दिल्या, त्यांचे मुखवटे आता सर्वोच्च न्यायालयानेच ओरबाडून काढले. निवडणूक रोखे हा देशाच्या इतिहासातील सगळ्यात मोठा घोटाळा आहे. मोदी व त्यांच्या पक्षाने टेबलाखालून नाही, तर सरळ टेबलावरून हजारो कोटी रुपये भ्रष्ट कंपन्यांकडून घेतले व त्या बदल्यात त्या कंपन्यांना मोठी कंत्राटे दिली. गुन्हेगारी स्वरूपाच्या या व्यवहारातून 'मनी लाँडरिंग' झाले हे उघड दिसते. भारतीय जनता पक्षाच्या खात्यात इलेक्टोरल बॉण्डच्या माध्यमातून सात हजार कोटी रुपये आले. हा पैसा देणाऱ्या दानशूरांची यादी आता निवडणूक आयोगाने जाहीर केली. त्याबद्दल देश सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांचा आभारी राहील. स्टेट बँकेने या दानशूरांची यादी जाहीर करण्यास नकार दिला तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने त्यांना दम भरला. तेव्हा स्टेट बँकेने ही माहिती निवडणूक आयोगाकडे सुपूर्द केली. मात्र त्यातही एकूण २२ हजार २१७ इलेक्टोरल बॉण्डस्पैकी फक्त १८ हजार ८७१ बॉण्डस्चीच माहिती का दिली? बाकीचे ३ हजार ३४६ बॉण्डस् गुलदस्त्यात का ठेवले? या प्रश्नांचीही उत्तरे जनतेसमोर यायला हवीत. अर्थात या संपूर्ण प्रकरणात भारतीय जनता पक्षाच्या देशभक्तीचे व भ्रष्टाचार हटवण्याचे ढोंग पुरते उघडे पडले आहे. पाकिस्तानच्या कंपन्यांकडून शेकडो कोटी रुपयांचा निधी भारतातील पक्ष स्वीकारतात व लोकांना देशभक्तीचे धडे देतात. पुलवामा हल्ल्यानंतर वींल पॉवर कंपनीने भारतातील इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी केले व भारतीय जनता पक्षाला दान दिले. हे खरे असेल तर या पाकिस्तानी कंपनीने भाजपलाच हे दान का दिले व त्यामागे पुलवामा हत्याकांडाचा काही संबंध आहे काय, याची चौकशी होणे गरजेचे आहे. साधारण १३०० कंपन्या व खासगी लोकांनी इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी केले व सात हजार कोटी रुपयांचे दान भाजपास दिले. २०१९ ते २०२४ या अल्प काळात हा गोरखधंदा झाला. यादीत अशा अनेक कंपन्या आहेत त्यांनी त्यांना सरकारकडून कंत्राटे मिळाली. फ्युचर गेमिंग ॲण्ड हॉटेल सर्व्हिसेसची ४०९ कोटींची संपत्ती ईडीने जप्त केली होती. ही संपत्ती जप्त केली २ एप्रिल २०२२ रोजी. कंपनीने १०० कोटींचे इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी केले ७ एप्रिल २०२२ ला आणि तो निधी भाजपला दिल्यावर या कंपनीवरील 'ईडी'ची कारवाई थांबली. खाण क्षेत्रातील वेदांत समूहाने ४०० कोटी रुपयांचे बॉण्डस् खरेदी करून भाजपला दान करताच सरकारी कंपनी बीपीसीएल वेदांत समूहास मिळाली. मुंबई-ठाण्यातील 'बुलेट ट्रेन' पूल बांधणीचे काम मेघा इंजिनीअरिंगला मिळताच या कंपनीने भाजपला मोठा निधी दिला. डिसेंबर २०२३ मध्ये साई इलेक्ट्रिकल्स कंपनीवर ईडीचे छापे पडले. लगेच जानेवारी २०२४ ला याच कंपनीने शंभर कोटींवर इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी करून भाजपला दान दिले. हजारो कोटींचा हा बेनामी आणि काळा पैसा आहे. त्या गंगेत सर्वाधिक हात 'नीतिमान' भाजपने धुऊन घेतले आहेत. मोदी यांची लढाई काळ्या पैशांविरुद्ध होती. २०१४ साली त्यांचा तोच नारा होता. परदेशी बँकेतील सर्व काळा पैसा ते भारतात आणणार होते. पण त्यांच्या काळात स्टेट बँक ऑफ इंडिया हीच भाजपच्या काळ्या पैशाची तिजोरी बनली. ईडी, सीबीआयचा वापर करून भाजपने मोठ्या कंपन्यांकडून खंडणीखोरी व हप्तेवसुली केली. भाजपच्या किमान ५० मोठ्या देणगीदारांवर ईडी, सीबीआय व इन्कम टॅक्सने धाडी घातल्या. भाजपच्या खात्यात पैसे जमा करा नाही तर ईडी कारवाईस तयार राहा. दाऊद इब्राहिमची टोळी मुंबईत अशाच पद्धतीने खंडण्या गोळा करीत होती. खंडणी न देणाऱ्यांना या टोळ्यांनी सरळ गोळ्या घातल्या. भाजपने खंडणी न देणाऱ्यांना तुरुंगात टाकले. बाकी मोडस ऑपरेंडी तीच. छत्तीसगड निवडणुकीच्या काळात तेथील तत्कालीन मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्यावर महादेव गेमिंग ॲप प्रकरणी धाडी घातल्या, पण जुगारी ॲपकडून बाराशे कोटींचे दान भाजपच्याच पारड्यात पडल्याचे स्पष्ट दिसते. अनेक बनावट कंपन्या स्थापन करून त्या माध्यमातून कोट्यवधींचे बॉण्डस् खरेदीचा खेळ भाजपने केला. ज्या कंपन्यांची उलाढाल दोनशे कोटींची नाही त्या कंपन्या तीनशे कोटींचे बॉण्डस् खरेदी करतात व भाजपला दान देतात. हा सरळ सरळ काळ्याचे पांढरे करण्याचा धंदा आहे. हे सरळ सरळ मनी लाँडरिंग आहे. भाजपने हे मनी लाँडरिंग केले.

# लोकसभा निवडणूकीत मविआ-महायुतीतला समसमान जागा?

**मुंबई । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुक कोणत्याहीक्षणी लागण्याची शक्यता आहे. या निवडणुकीसाठी सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांसाठी निवडणूक होणार आहे. या ४८ जागांपैकी २८ जागा महायुतीला जिंकता येणार आहेत. खरं तर महायुतीने ४५ जागा जिंकण्याचे लक्ष ठेवले आहे. पण त्यांना २८ जागांवरच समाधान मानावे लागणार आहे. त्यामुळे महायुतीसाठी हा मोठा धक्का असणार आहे. तर महाविकास आघाडीला २० जागा जिंकता येणार आहेत. वोटर सर्व्हेचा ओपिनियन पोलसमोर आला आहे. या सर्व्हेनुसार, आगामी लोकसभा निवडणूकीत भाजपला २२ जागा जिंकता येणार आहेत. महायुतील घटक पक्षांना एकत्र मिळून ६ जागाच जिंकता येणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला केवळ २८ जागा जिंकता येणार आहेत. खरं तर महायुतीने लोकसभा निवडणुकीत ४५ जागा जिंकण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. मात्र या सर्व्हेनुसार महायुतीला हे लक्ष्य गाठता येत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे महायुतीला हा मोठा झटका आहे. महाविकास आघाडी बद्दल बोलायचं झालं तर, मविआला १६ जागा जिंकण्याचा अंदाज आहे. तर काँग्रेसला ६ जागा जिंकता येणार आहेत. त्यामुळे एकूण महाविकास आघाडीला २२ जागाच जिंकता येणार आहेत. ओपिनियन पोलनुसार मतांच्या टक्केवारीबद्दल बोलायचं झालं तर, लोकसभा निवडणुकीत भापज प्रणित एनडीएला ४२.७ टक्के मतं मिळतील. दरम्यान २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला एकूण ५०.८८ टक्के मतं मिळाली होती. महाराष्ट्रात त्यावेळेस भाजप आणि शिवसेनेच्या युतीला मिळालेली ही मतं आहेत. पण २०२४ च्या निवडणुकीत एनडीएच्या मतांच्या टक्केवारीत ८ टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज आहे.

# आचारसंहिता लागू होण्यापूर्वी प्रकल्पांना मान्यता - गडकरी

**संभाजीनगर । वृत्तसेवा**



केंद्रीय निवडणूक आयोग लोकसभा निवडणुकांची घोषणा करणार आहे. त्या अगोदर केंद्रीय मंत्रिमंडळाने मोठ्या प्रकल्पांना मंजूरी दिली आहे. आजपासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू होणार आहे. आचारसंहिता लागू झाल्यावर कोणताही विभाग कोणताही नवीन प्रकल्प मंजूर करत नाही. दरम्यान मोदी सरकारच्या अनेक खात्यांनी झटपट निर्णय घेऊन कोट्यवधींच्या प्रकल्पांना मंजुरी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या रस्ते वाहतूक मंत्रालय आणि छक-ख अंतर्गत विभागांमध्ये शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत काम सुरू होते. या कालावधीत मंत्री गडकरी यांनी १७०० कोटी रुपयांच्या तीन महामार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. हे महामार्ग प्रकल्प गुजरात, आसाम आणि कर्नाटकसाठी आहेत. याशिवाय उज्जैन रेल्वे स्टेशन ते मध्य प्रदेशातील महाकालेश्वर मंदिरापर्यंत १८९ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या रोपवेलाही मंजुरी देण्यात आली आहे. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी योजनांना तातडीने मंजुरी देण्यात आली. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर नवीन प्रकल्पांना मंजूर देता येत नाही. गडकरी यांच्या व्यतिरिक्त केंद्रीय जहाजबांधणी मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनीही आसाममधील ब्रह्मपुत्रा नदीवर ६४५ कोटी रुपयांच्या १० नवीन जलमार्गांना मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या सागरमाला कार्यक्रमांतर्गत या प्रकल्पांना केंद्राकडून १०० टक्के निधी मिळणार आहे. त्याचप्रमाणे गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालयाने ९२५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालयाचे सचिव अनुराग जैन यांनी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घन आणि द्रव कचरा व्यवस्थापन प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. आदर्श आचारसंहिता लागू होण्याआधी, सरकारने घरगुती कच्च्या तेलावरील विंडफॉल कर ३०० रुपये प्रति टन वाढवून ४,९०० रुपये प्रति टन करण्याची घोषणा केली.

## राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा तगडा संघ

नागपूर - महाराष्ट्राच्या कबड्डी संघात वर्णी लावण्यासाठी कुणी खासदारांची ओळख दाखवत होता, कुणी आमदारांकडून फोन करत होता, कुणी राज्य संघटनेकडे वशिला लावत होता, पण यंदा ७० व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राला तगडा संघ देण्यासाठी निवड समिती आणि प्रशिक्षकांनी वशीलेबाज नव्हे तर खर्या अर्थाने जोशीलेबाज असलेल्या १२ गुणवान खेळाडूंची निवड केली आहे. राज्य संघात निवड व्हावी म्हणून कबड्डीपटू खेळापेक्षा वशीलेच लावत होते. हा प्रकार मी माझ्या डोळ्याने गेले चार दिवस अनुभवतोय. पण कबड्डीसाठी हा प्रकार नवीन नाही. पण मी निवड समितीला एकच सांगितले होते, जे काही निवडाल ते जिंकून देणारे खेळाडूच निवडा. खेळाडूंची अंतिम यादी पाहिल्यानंतर मला अनपेक्षित आणि सुखद धक्का बसला आहे. मला एक तगडा आणि खर्या अर्थाने जिंकून देणारा संघ निवडून दिला आहे. आता आमची जबाबदारी वाढलीय. आम्ही आमचा जबरदस्त खेळ दाखवून महाराष्ट्राला अजिंक्यपद मिळवून देण्यासाठी सर्वस्व पणाला लावू.

## लोकसभा निवडणूकीपुर्वी सरकारचं नामांतरचं ढोंग

**मुंबई । वृत्तसेवा**

लोकसभेपुर्वी महायुतीची शेवटची कॅबिनेट पार पडली. यात अनेक महत्त्वाचे निर्णय झाले. मात्र, सर्वांचं लक्ष आकर्षित करुन घेतलंय ते सरकारच्या नामांतरच्या धडाक्यानं. अहमदनगर जिल्ह्यास मुंबईतील आठ स्थानकांची नावं बदलण्यात आलीयेत. मुंबई रेल्वे स्थानकांना ब्रिटिशांनी दिलेली नावे आता इतिहास जमा झालीयेत. मुंबई उपनगरीय रेल्वेच्या आठ रेल्वे स्थानकांची नावे बदलण्यात आलीये. यांनी नामांतरला तत्वतः मान्यता दिली आहे. केंद्र सरकारच्या अंतिम मंजुरीनंतर रेल्वे स्थानकांची नवीन नावे लागू होतील. नगर जिल्ह्याचे नावही सरकारने बदललंय. आता नगरला 'अहिल्यादेवी नगर' (पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर) असं नाव देण्यात आलंय. यापूर्वी सरकारने औरंगाबादचे संभाजी नगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असं नामकरण केले होते. राज्य मंत्रिमंडळाची तीन दिवसांत दोनदा बैठक झाली. सोमवारच्या बैठकीत तब्बल ३३ निर्णय झाले. बुधवारच्या बैठकीत २६ निर्णय घेण्यात आले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेपूर्वी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आलेत.

# संचालकांचा पारदर्शक कारभार -आ.मोनिका राजळे

**नगर । प्रतिनिधी**



अवघ्या दहा महिन्यात एक कोट ३५ लाख रुपयांचे उत्पन्न घेत बाजार समितीच्या पदाधिकारी व संचालकांनी उत्तुंग झेप घेत शेतकरी व व्यापारी हित जपण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले. बाजार समितीच्या नवीन भुईकाटा उदघाटन व कांदा शेड कामाच्या भूमिपूजन प्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, बाजार समिती अध्यक्ष सुभाष बर्डे, उपाध्यक्ष कुंडलिक आव्हाड,माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, नंदकुमार शेळके, संचालक शेषराव कचरे, अजय रक्ताटे, नारायण पालवे, पांडुरंग लाड, वैभव खलाटे, शुभम गाडे,प्रशांत मंडलेचा, संजय बडे, विष्णुपंत अकोलकर, माणिक खेडकर, रामकिसन काकडे, अमोल गर्जे, नितीन गर्जे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष संदीप पठाडे,समितीचे सचिव बाळासाहेब बोरुडे हे उपस्थित होते. या वेळी अद्यावत काटा बसवल्या बद्दल व्यापारी व हमाल संघटनेने राजळे व समितीच्या पदाधिकार्यांचा सत्कार केला. पुढे बोलताना राजळे म्हणाल्या की,विद्यमान संचालकांनी काटकसरीने व पारदर्शक कारभार केल्याने आज समिती मध्ये आर्थिक सुबत्ता दिसून येत असून भविष्यात पणन महासंघ व राज्यशासनाच्या मदतीने या ठिकाणी शेतकरी निवास उभारले जाणार आहे.कांदा मार्केट सुरु करावे अशी कांदा उत्पादकांची मागणी होती ती पूर्ण होत असल्याचा आनंद आहे.अधिक क्षमतेचा वजनकाटा बसवून समितीने व्यापार्यांची मोठी सोय केली आहे. व्यापारी गाळे, भूखंड म्हणजेच बाजार समिती असा मर्यादित अर्थ न काढता व्यापार्यांना व शेतकर्यांना अधिक सुविधा देण्याचे काम केल्यास शेतकर्यांना व व्यापार्यांना आपला माल याच ठिकाणी विकणे सोपे जाणार आहे.खरेदी विक्री संघाचे व्यापारी संकुल लवकरच सुरु होऊन त्याचा व्यापार्यांना मोठा फायदा होणार असल्याचे शेवटी राजळे म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष बर्डे सूत्रसंचालन राजू सुरवसे तर आभार पांडुरंग लाड यांनी मानले.

# मोदींमुळं गडकरींचा निवडणुकीत पराभव?

**नागपूर । वृत्तसेवा**





भाजपची पहिली लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर झाली. १९५ उमेदवारांच्या यादीत एक नाव मिसिंग होतं केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचं. प्रत्येक निवडणूकीत भाजपकडून धक्का तंत्राचा वापर होतो. ही रणनिती भाजपच्या राजकारणाचा हा एक महत्त्व पुर्ण भाग आहे. पहिल्या यादीत महाराष्ट्रातल्या एकही संभाव्य उमेदवाराचं नाव नसल्यानंही चर्चा रंगलीये. या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसीतून तिसऱ्यांदा अमित शहा गांधीनगर मधून दुसऱ्यांदा आणि राजनाथसिंग लखनऊ मधनं तिसऱ्यांदा निवडणूक लढवणारे. या नेत्यांप्रमाणे भाजपाच्या पहिल्या फळीतले नेते म्हणून गडकरी ओळखले जातात. नितीन गडकरींना पहिल्या यादीत तिकीट मिळेल अशी अपेक्षा होती. पण तसं घडलेलं दिसत नाहीये. नितीन गडकरींचं नाव यादीत नसल्यामुळं सगळीकडे चर्चांना उधाण आलंय. नितीन गडकरींचं तिकीट भाजप कापलंय की गडकरींना सन्यास घ्यायचा आहे? या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. संत्र्यांचं शहर अशी नागपूरची ओळख आहे. देशाच्या अगदी मधोमध वसलेलं हे शहर. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं मुख्यालयही याच नागपूरात आहे. नागपूरमधूनच नितीन गडकरींना राजकारणाची सुरुवात केली. स्वयंसेवक, एबीव्हीपी मग भाजप कार्यकर्ते व भाजप पदाधिकारी अशी दरमजल करत ते टॉपच्या नेत्यांच्या यादीत आहेत. तरी लोकसभा उमेवारांच्या पहिल्या यादीत त्यांचं नाव नाहीये. महाराष्ट्र विधीमंडळ गाजवणारे गडकरी २०१४ मध्ये नागपूर लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला. २०१९ ला ते नाना पटोले यांचा दणदणीत पराभव करत खासदार झाले. आता वेळंय हॅट्रिकची? आता तिसऱ्यांदा ते निवडणूक लढवणार का याकडे सगळ्यांचे लक्षंय.अ शात नागपूरच्या जातीय समीकरणांची गोळाबेरीज केली जातीये. ओबीसी, तेली, कुणबी, मुस्लीम मतांचा फॅक्टर चर्चेत आहे. भाजप लोकसभा मतदारसंघात एकूण १२ विधानसभा मतदारसंघ येतात एकूण तालुके आहेत १४ आणि इथली लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार आहे जवळपास ५० लाख. निवडणुका सुरू झाल्यापासून आत्तापर्यंत १२ वेळा लोकसभा मतदारसंघात काँग्रेसने विजय मिळवला होता. तो काँग्रेसचा एकेकाळचा बालेकिल्ला होता. तरी मतदार संघ गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून भाजपने स्वतःकडे ठेवलाय, कारण याच नागपूरमध्ये फडणवीस गडकरी बावनकुळे यांसारखे भाजपाचे दिग्गज नेते गेल्या वीस वर्षात तयार झालेत. गडकरी या लोकसभा मतदार संघाचं प्रतिनिधीत्त्व करतायेत. भाजपाची केंद्रीय जी यंत्रण आहे त्यानुसार प्रत्येक खासदारासाठी वयाची मर्यादा घातलेली आहे. कदाचित या वयाच्या मर्यादेत गडकरी बसू न शकल्यामुळे गडकरींना तिकीट नाकारला जाऊ शकतं. तर दुसरी बाजू अशी आहे की भाजपने महाराष्ट्रातल्या एका उमेदवाराची यादी अजून जाहीर केलेली नाहीये. महाराष्ट्रात महायुतीमध्ये जागावाटपाचा चर्चा अजून सुरू आहेत अमित शहा स्वतः महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येऊन या जागा वाटपात लक्ष घालणारे त्यामुळे काही दिवसातच जेव्हा महाराष्ट्रातली यादी जाहीर होईल तेव्हा गडकरींना तिकीट मिळाले की नाही याची अधिकृत माहिती समजू शकेल. नितीन गडकरींची देशरातील ओळख रोडकरी अशीये. मोदींच्या मंत्रीमंडळात स्वतःचं मत व्यक्तिगतरित्त्या मांडणारे एकमेव मंत्री अशी त्यांची ओळखंय. दोघांमध्ये सुप्त संघर्षही आहे. त्यामुळं अनेकदा मोदींच्या नेतृत्त्वात निवडणूक लढवणार नसल्याची इच्छा स्वतः गडकरींनी अनेकदा व्यक्त केलीये. त्याला मान देवून दिल्लीतील जेष्ठ नेते गडकरींच्या विनंतीला मान देवू शकतात. त्यामुळे राज्यसभेच्या माध्यमातून गडकरींचं पुनवर्सन होऊ शकतं. मात्र, तसं झालं तर मोदींना याचा फटका बसु शकतो. कारण, इंडिया आघाडीचे पक्ष अनेकदा मोदी गडकरी वाद अधोरेखित करतायेत. शिवाय मोदी ज्या विकासाचं श्रेय घेतात ते मुलभूत सुविधा, रस्त्यांचं जाळ गडकरींनी विणल्याचा प्रचार होऊ शकतो. त्यामुळं अत्यंत विचारपुर्वक निर्णय घेण्याची वेळ भाजपवर आलीये.

## तुरीची आवक राज्यात वाढली



लातूर - राज्यात तूरीची मोठ्या प्रमाणावर आवक होत असून क्विंटलमागे तूरीला चांगला भाव मिळत आहे. लाल तूरीसह, पांढरी, गज्जर, नं १ तूरीची राज्यातील विविध बाजारसमित्यांमध्ये ७०३९ क्विंटल आवक झाली. अमरावतीत आज सर्वाधिक लाल तूरीची आवक झाली असून प्रति क्विंटल सर्वसाधारण १० हजार ४५ रुपये भाव मिळाला. धाराशिव बाजारसमितीत आज गज्जर तूरीला सर्वाधिक भाव मिळत असून क्विंटलमागे सर्वसाधारण १० हजार ३७१ रुपये ते १० हजार ५३५ रुपयांच्या दरम्यान भाव आहेत. नागपूर बाजारसमितीतही तूरीला आज चांगला भाव मिळत असून क्विंटलमागे सर्वसाधारण १० हजार ११६ रुपये भाव सुरु आहे. मागील आठवड्यापासून तूरीला चांगला दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा तूर विक्रीकडे मोठा कल दिसून येत आहे. १६ मार्च रोजी तूरीला सकाळच्या सत्रात मिळालेला दर कसा होता? जाणून घ्या.

## उमेदवारांना गुन्ह्यांची माहिती प्रसिद्ध करणे बंधनकारक

मुंबई -देशाच्या निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीची घोषणा शनिवारी केली. लोकसभेच्या आणि सोबत होत असलेल्या चार राज्यांत विधानसभा निवडणुका होत आहेत. विशेष म्हणजे या निवडणुकीत उमेदवारांना गुन्हेगारी पार्श्वभूमी लपवता येणार नाही. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना प्रचार काळात तीनवेळा त्यांच्यावरील प्रलंबित गुन्ह्यांची माहिती वृत्तपत्र आणि टीव्ही चॅनलवर प्रसिद्ध करावी लागणार आहे. तर गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना तिकीट का दिले? याचीही माहिती संबंधित पक्षांना प्रसिद्ध करावी लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०२०ला हे आदेश दिले होते. या आदेशांची लोकसभा निवडणुकीत अंमलबजावणी होण्याची ही पहिलीच वेळ असेल. निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर याची संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना प्रचार काळात तीन वेळा त्यांच्यावरील आरोपांची माहिती वृत्तपत्र आणि टिव्ही चॅनलवर द्यावी लागणार आहे. शिवाय जे राजकीय पक्ष गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना तिकीट देतात, अशा पक्षांना संबंधित उमेदवारांची माहिती पक्षाची वेबसाईटवर प्रसिद्ध करावी लागेल, तसेच वृतपत्र आणि टिव्ही चॅनलवर तीन वेळा ही माहिती प्रसिद्ध करावी लागणार आहे.

## लोकसभा निवडणुकीमुळे अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : राज्यातील लोकसभा निवडणुकांच्या तारखा उद्या जाहीर होणार आहेत. त्याआधीच राज्यातील ४ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार यांची अखेर बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांची पुणे महापालिका आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. तर विक्रम कुमार यांची एमएमआरडीएच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य सरकारने पुन्हा एकदा राज्यातील अनेक महत्त्वपूर्ण पदांवरील अधिकाऱ्यांच्या आज बदल्या केल्या आहेत. पुणे महापालिकेच्या आयुक्त पदावरून विक्रम कुमार यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी राजेंद्र भोसले यांची पालिका आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. राजेंद्र भोसले हे मुंबई उपनगर येथे जिल्हाधिकारी होते. त्यापुर्वी त्यांनी नगर येथे जिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे.

## परभणी जिल्ह्यात उमेदवारांना मिळाल्या नियुक्त्या

परभणी : जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट क संवर्गातील तलाठी पदभरतीत (२०२३) जिल्हा आस्थापनेवर रिक्त असलेल्या ८१ जणांना नियुक्त्या देण्यात आला. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी काढले आहे. रिक्त असलेल्या तलाठी संवर्गातील ९५ पदांची भरतीचीर प्रक्रिया राबविण्यात आली होती. यासाठी एकूण २१ हजार ४३३ उमेदवारांनी परीक्षेसाठी अर्ज भरले होते. १७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबरदरम्यान ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. या पदभरतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीसंदर्भात ८१ उमेदवारांना तलाठी पदावर नियुक्तीचे आदेश देण्यात आले. यात परभणी तालुक्यात १४, पुर्णा १०, पालम ८, गंगाखेड ९, सोनपेठ ६, पाथरी ६, मानवत ५, सेलू ८ आणि जिंतूर तालुक्यात १५ जणांना नियुक्ती देण्यात आली. संबंधितांना तातडीने नियुक्तीचे आदेश असल्याने त्यानुसार जिल्हाधिकारी रघुनाथ गावडेयांनी याबाबत निर्देश काढलेत. यात अनुकंपा यादीतील २ उमेदवारांना महसूल सहायक म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर यांच्यासह आस्थापना विभागातील कर्मचारी यांनी काम पाहिले.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये शिक्षकांसाठी ड्रेस कोड

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्य सरकारने महाराष्ट्रातील सर्व शाळांच्यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता राज्यातील प्रत्येक शाळेत ड्रेस कोड लागू होणार आहे. त्यामुळे शाळेत आता शिक्षकांना टी-शर्ट किंवा जीन्स पँट परिधान करता येणार नाही. सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधील पुरूष व महिला शिक्षकांना शाळा (डलहेश्री) निश्चित करेल अशा रंगाच्या ड्रेसकोडचे पालन करणे बंधनकारक असेल. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी याबाबतची घोषणा केली. राज्यातील शाळांमध्ये ड्रेसकोड लागू



झाल्यानंतर शिक्षकांना त्यांच्या मनाप्रमाणे कोणतेही कपडे घालता येणार नाहीत. शाळेतील सर्व शिक्षकांना व्यवस्थापनाने निश्चित केलेले कपडे परिधान करावे लागतील. महिला शिक्षकांना साडी अथवा सलवार-चुडीदार, कुर्ता,दुपट्टा असा पेहराव असावा. तर पुरूष शिक्षकांना शर्ट-ट्राउझर पँट घालावी लागेल. शर्ट इन असावा तसेच गडद रंगाचे व चित्रविचित्र नक्षीकाम किंवा चित्रे असलेले पेहराव घालू नयेत.तसेच शिक्षकांनी जीन्स -शर्टचा वापर शाळेमध्ये करू नये या मार्गदर्शक सूचनाही देण्यात आल्या आहेत. एकीकडे राज्य सरकारने शिक्षकांसाठी ड्रेसकोड लागू केला असेल तरी दुसऱ्या बाजुला त्यांच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. सरकारने घेतलेल्या आणखी एका निर्णयामुळे शिक्षकी पेशा आता स्टेटस सिम्बॉल होणार आहे. शिक्षकांना समाजात प्रतिष्ठेचे स्थान असल्याने शिक्षकांच्या नावाच्या आधी इंग्रजीत टीआर (ढी)आणि मराठीत टि असे संबोधन लावण्याची परवानगी देण्यात आली आहे. ज्याप्रमाणे डॉक्टर यांच्या नावाच्या आधी डॉ. व डव्होकेट यांच्या नावाच्या आधी ड. संबोधन लावण्यात येते. त्याच धर्तीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षकांच्या वाहनावर देखील हे संबोधन व त्याअनुरूप बोधचिन्ह देखील लावण्याची परवानगी देण्यात आल्याचे दीपक केसरकर यांनी सांगितले.

# देशातला सर्वोत्तम सायबर सिक्युरिटीचा प्लॅटफॉर्म राज्यात होणार - फडणवीस

**मुंबई । वृत्तसेवा**

न्यायवैद्यकमध्ये (फॉरेन्सिकमध्ये) राज्याला नंबर एक आणणार आहोत. बँका, नॉन बँकींग फायनान्शियल डिस्ट्रीब्युटर, रेग्युलेटर, सोशल साईट्स एकाच प्लॅटफॉर्मवर असतील. सायबर गुन्हा घडला विशेषतः पैशाविषयी घोटाळ्याची घटना घडली की, तासाभरात पैसे परत मिळतील, असा चांगला प्लॅटफॉर्म करण्याचे काम चालू आहे. हा देशातला सर्वोत्तम प्लॅटफॉर्म असणार आहे. यातून सायबर सुरक्षा मिळेल. कोकणात पायाभूत सुविधा, नवीन मानक तयार करण्यावर शासनाने मोठा भर दिला आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी येथे केले.



पोलीस अधीक्षक कार्यालय आणि पोलीस वसाहत नूतन इमारतीचे भूमीपूजन उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा आणि भारतीय साक्ष कायदा या नव्या कायद्यांमुळे जलद न्याय मिळणार आहे. यासाठी केंद्र आणि राज्य शासन काम करत आहे. सायबर सुरक्षा देण्याचे काम होत आहे. काजू उत्पादकांसाठी ३५० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय केला आहे. सर्व सामान्यांचा विचार करणारे आपले सरकार आहे. बचत गटाचे भांडवल दुप्पट केले आहे. महिलांच्या हातांना रोजगार देण्याचे काम, त्यांना सक्षम करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'शक्तीवंदना'च्या माध्यमातून केले आहे. जिल्ह्यातल्या बचत गटांना मिळलेल्या २३५ कोटी रुपयांमधून महिला अत्यंत वेगाने रोजगारविषयक काम चालू करतील. त्यातून त्या सक्षम होतील. या वेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री चव्हाण म्हणाले, ''राज्यशासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला. जिल्ह्याचा चेहरा-मोहरा पालटण्याचे काम होत आहे. गोव्याच्या धर्तीवर राज्यशासन काजू उत्पादकांसाठी सकारात्मक निर्णय घेत आहे. पालकमंत्री उदय सामंत म्हणाले, फडणवीस अर्थमंत्री असतांना प्रशासकीय इमारतीसाठी निधी संमत केला होता. याचे लोकार्पणही आपल्या हस्ते व्हावे. रत्नागिरीत 'जेम्स अँड ज्वेलरी'चे प्रशिक्षण केंद्र होत आहे. त्यामधून ३५ सहस्र ते २ लाखांपर्यंत युवकांना रोजगार मिळणार आहेत. डिफेन्स क्लस्टरचा सामंजस्य करारही रत्नागिरीत करावा.

## लातूर संघावर पालघर संघाची मात


पुणे । वृत्तसेवा

आजचा शेवटचा सामना पालघर विरुद्ध लातूर यांच्यात झाला. सामन्याचा सुरुवातीलाच पालघर संघाने आक्रमक खेळ केला. पालघरच्या प्रतीक जाधव ने सलग चढाया करत आपल्या संघाला गुण मिळवून दिले. सामन्याच्या ५ व्या मिनिटाला पालघर संघाने लातूर संघावर लोन पडत १०-०० अशी आघाडी मिळवली होती. त्यानंतर मात्र लातूरच्या प्रदिप आकांगिरे ने चढाईत गुण मिळवले. आकांगिरे व सोहेल शेख ने चतुरस्त्र चढाया करत मध्यंतराला ५ मिनिटं शिल्लक असताना पालघर संघाला ऑल आऊट करत पिछाडी कमी केली. १५-१४ अशी नाममात्र १ गुणांची आघाडी होती. मध्यांतरापुर्वी आकांगिरे ने सुपर टेन पूर्ण करत लातूर संघाला आघाडी मिळवून दिली. मध्यंतराला १९-१६ अशी लातूर संघाने आघाडी मिळवली. मध्यंतरा नंतर पालघरच्या प्रतिक जाधव ने सुपर टेन पूर्ण केला.

# महाराष्ट्रातूनच नरेंद्र मोदींची सत्ता जाणार

**मुंबई । वृत्तसेवा**

मणिपूर येथून निघालेली न्याय यात्रा आज मुंबईत आली आहे. भाजपच्या राज्यात कशी वागणूक या यात्रेला मिळाली हे आपण बघितले आहे. अनेक राज्यात ताफ्यावर जी दगडफेक झाली त्याचे आम्ही निषेध करत आहोत. मंदिरात जाऊ दिले नाही. तुम्हाला पूजा करायचा अधिकार नाही. आम्ही धर्माचे ठेकेदार आहोत असे दाखवले गेले. महाभारतात धृतराष्ट्राची भूमिका हे सरकार बजावत आहे. सरकार मणिपूरच्या मुद्द्यावर बोलत नाही. महाराष्ट्रातूनच नरेंद्र मोदींच्या सत्तेचे पतन होणार हे नक्की आहे, अशी टीका नाना पटोले यांनी मोदी सरकारवर केली आहे. आज काँग्रेस नेते भारत जोडो न्याय यात्रा ठाणे येथे



धडाडली आहे. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना नाना पटोले बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आमच्या इलेक्टोरल बॉण्डचा हिशोब घ्या. त्यांना हजारो कोटी रुपये कसे मिळाले? राजस्थानमध्ये झालेल्या गोष्टीची निंदा यांनी केली. आमचे सरकार असेल आणि काही चूक झाली तर आम्ही मुख्यमंत्री बदलतो. असं भाजप करत नाही. स्त्री शक्ती पुन्हा ताकदीने उभी राहावी, यासाठी आम्ही पाच गॅरंटी दिल्या आहेत. गॅरंटी हा शब्द आणि मोदी हे जोडशब्द वापरतात तो खरा जुमलेबाजी आहे. खरी गॅरंटी ही काँग्रेसने दिली आहे. इलेक्टोरल बॉण्डमध्ये न खाऊंगा न खाने दूंगा हे बोलणारे मोदी कुठे गेले? स्टेट बँक सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करत नव्हते. सुप्रीम कोर्टाने फटकारले. त्यांचं लपलेला पाप उघडकीस आलं. व्हॅक्सिनेशन कंपनीकडून खंडणी घेतली. देवेंद्र फडणवीस आणि हे काळाबाजार करणाऱ्या एका व्यापाऱ्याला रात्री कुबेर काळात सोडवायला गेले. मेलेल्यांच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. हे इलेक्टोरल बॉण्डच्या माध्यमातून पाहायला मिळत आहे. लोकांचे नेतृत्व करू शकतात, असा विश्वास मणिपूर ते मुंबई सहा हजार किलोमीटर चालून आल्यावर निर्माण झाला आहे. लोकांना, गरिबांना, कामगारांना, शेतकऱ्यांना अशा सगळ्यांना न्याय द्यायला ही यात्रा काढून गॅरंटी दिली. देशात सत्तेचे परिवर्तन होणार आहे. इंडिया आघाडीचे सरकार येणार हा लोकांच्या विश्वास आहे, असेही नाना पटोले यांनी म्हटले आहे.

# लोकसभा सार्वत्रिक निवडणुक विविध विषयांवर निर्बंध -जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम आज जाहीर केला आहे. आजपासून आदर्श आचार संहिता लागु झालेली आहे. बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपुर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्ह्यात कसल्याही प्रकारचे जात, भाषा , धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनावर निर्बंध घालण्यात आली असल्याची माहिती पत्रकारद्वारे जिल्हाधिकारी दीपा मुदोळ



मुंडे यांनी कळविली आहे. जिल्हादंडाधिकारी बीड फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन असे आदेश जारी करण्यात आलेले आहे, जिल्ह्यात कुठेही कसल्याही प्रकारचे जात, भाषा , धार्मिक आयोजनावर निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत (दिनांक ०६.०६.२०२४ पर्यंत) निर्बंध राहतील. प्रत्येक ईसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीस विभागाने जाहीर करुन त्यास प्रसिध्दी करावी असेही आदेशीत केले असून हे आदेश आज शनिवार दिनांक १६/२०२४ रोजीपासून लागु होतील.

# उपोषण मागे घेण्यासाठी आ.नीलेश लंकेंची मध्यस्थी

**नगर । वृत्तसेवा**

नगर-पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील प्रलंबित चौपदरीकरणाचे काम मार्गी लागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काला म्हणून तातडीने प्रांताधिकार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर सचिन शेळकेंसह ग्रामस्थांनी पाचव्या दिवशी उपोषण मागे घेतले. गावात चौपदरीकरणाचे काम रखडल्याने महामार्गावर अपघातांची मालिका सुरू आहे. वाहनांची वाढती संख्या व अरुंद रस्ता, यामुळे शालेय विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना जीव मुठीत धरून महामार्गावरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे सचिन शेळके याच्यांसह ग्रामस्थांनी ११ मार्चपासून रोजी गावात उपोषण सुरू केले होते. गावातील रस्त्याचे ९४५ पैकी ८१५ मीटरचे काम करण्यात आले. परंतु, उर्वरित १३० मीटर काम प्रलंबित आहे. या रस्त्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सुपूर्द करण्यात आला होता. परंतु, रस्त्याचा प्रस्तावात त्रूटी असल्याचे भूसंपादन विभागाकडून सांगण्यात येत होते. त्यामुळे तिढा सुटत नव्हता. उपोषणाची तीव्रता लक्षात घेवून सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने प्रस्तावात दुरुस्त्या करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिला. परंतु, प्रशासनाकडून वेळकाढूपणा सुरूच होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने भूमि अभिलेख कार्यालयाकडे सदर रस्त्याच्या मोजणीची फी जमा केली होती. परंतु, प्रस्तावाच्या सदर रस्त्याची मोजणी रेंगाळली होती.

# दानवे करणार पक्षांतर?

**जालना । वृत्तसेवा**

आमच्याद वाद नाही, मतभेद नाहीत असे सांगत ज्याला कोणाला उमेदवारी मिळेल त्याचा एकदिलाने प्रचार करू असे सांगणारे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे चंद्रकांत खैरेंना लोकसभेची उमेदवारी मिळतेय असे समजल्यावर नाराज झाले आहेत. या नाराजीतून दानवे एक-दोन दिवसांत शिंदे गटात जाण्याचा मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतून शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाचे नेते माजी खा. चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी देण्यात येणार आहे. यामुळे दानवे नाराज झाले आहेत. दानवेंनाही लोकसभा लढवायची होती. गेल्या काही महिन्यांपासून दानवे तशी वक्तव्येही करत होते. जिल्ह्यात खैरे-दानवे यांचे सख्य सर्वांना ठाऊक आहे. पक्ष फुटीनंतर दोघेही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सोबत राहिले असले तरी उभयतांमध्ये विस्तव जात नाही. लोकसभेसाठी खैरे यांची उमेदवारी अद्याप जाहीर झाली नसली तरी ते कामाला लागले आहेत. खैरेंच्या उमेदवारीस दानवे यांचा विरोध आहे. ते स्वतः निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. तशी मागणीही त्यांनी केली आहे. मात्र, राज्यात प्रचारासाठी तुमची गरज असल्याचे दानवे यांना 'मातोश्री'वरून सांगण्यात आले. शिवसेना नेते खा. संजय राऊत यांनीही दानवे यांची मनधरणी केल्याचे समजते. दानवे शुक्रवारी सायंकाळच्या विमानाने मुंबईहून छत्रपती संभाजीनगरकडे निघाले होते. मात्र, अचानक त्यांना 'मातोश्री'वरून बोलावणे आल्याने ते विमानतळावरूनच माघारी फिरले, दानवे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न स्वतः उद्धव ठाकरे, महाविकास आघाडीतील एक बड़ा नेता एक- असल्याचे सूतोवाच पक्ष प्रवक्ते आ. संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत केला. शिरसाटांचे ते विधान दानवे यांना उद्देशून असल्याची चर्चा आहे. दानवे हे मुख्यमंत्र्यांचे विश्वासू समजले जातात. त्यांना खैरेंच्या विरोधात उमेदवारी मिळू शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे. लोकसभेला नव्या चेहऱ्याला संधी द्यावी, अशी आपण पक्षाकडे मागणी केली आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. मी पक्षाचा निष्ठावंत शिवसैनिक आहे. माझ्यासाठी संघर्ष नवा नाही. भविष्यात काय घडेल हे आताच सांगू शकत नाही.

# वसतिगृह बांधकाम, दुरुस्तीसाठी भरघोस निधी



**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून अंबाजोगाई येथील कृषी तंत्र विद्यालय यांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणीच्या कामास १४ कोटी ८७ लाख रुपये तसेच अंबाजोगाई येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थी वसतीगृहाच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी ५ कोटी ४८ लाख रुपये असे एकूण ३५ कोटी २२ लाख रुपये निधी मंजूर करून उपलब्ध करून देण्यात आला आहे. माजी आमदार संजय भाऊ दौंड यांनीही याबाबत मागणी व पाठपुरावा केला होता. दोन्ही कामांसाठी एकूण ३५ कोटी २२ लाख रुपये इतका निधी मंजूर करून उपलब्ध करून देण्यात आला असून या दोन्ही वसतीगृहांच्या कामांमुळे येथील विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार आहे. धनंजय मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यावर मोठ्या प्रमाणात भर दिला असून, कृषी विभागाच्या माध्यमातून देखील जिल्ह्यासाठी कृषी भवन त्याचबरोबर जिल्ह्यात सोयाबीन संशोधन केंद्र, यासह शासकीय कृषी महाविद्यालय व कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय यांसारख्या आस्थापना गेल्या काही दिवसात मंजूर करून त्यासाठी निधी देखील उपलब्ध करून दिला आहे.

## बीड लोकसभा निवडणुकीत मविआचा उमेदवार निवडून येणार

बीड – बीड जिल्ह्यात महाविकास आघाडीची ताकद मोठी आहे. त्यामुळे आघाडीचा उमेदवार निवडून येणार असे प्रतिपादन अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे महाराष्ट्र प्रदेश यांनी केले. यावेळी बोलताना महाविकास आघाडीच्या विजयासाठी पक्ष कटीबद्ध आहे. बीड जिल्ह्यातील केज येथे गुरूवार, दिनांक १४ मार्च रोजी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. बीड जिल्ह्यातील केज येथे गुरूवार, दिनांक १४ मार्च रोजी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या आढावा बैठकीचे आयोजन काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष,यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

## बीड येथे दुचाकी चोरींचे प्रमाण वाढले

बीड – शहरामध्ये मोटारसायकल चोरीचे प्रमाण वाढले. रात्री हॉटेल नीलकमल समोरून मोटारसायकल चोरून नेली. चोरटा मोटारसायकल चोरून नेताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. सदरील चोरट्याने एक गाडी चोरून नेली आणि त्याने आणलेली गाडी त्याच ठिकाणी सोडली आहे. या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली असून जी गाडी चोरट्याने घटनास्थळी सोडली ती गाडी चोरीची असल्याचे निष्पन्न झाले आहे. अधिक माहिती अशी कि, दीपक येडके यांनी आपले मामा वसंत रोहीदास तायड यांची मोटार सायकल (क्र. एम.एच. २३ एस. २६७०) ही रात्री हॉटेल नीलकमल समोर उभी केली होती. नऊ वाजण्याच्या दरम्यान एका चोरट्याने ही गाडी चोरून नेली. या चोरट्याच्या सोबत अन्य दोघेजण होते. चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. चोरट्याने एक गाडी चोरून नेली तर दुसरी घटनास्थळी सोडली. त्या गाडीचा नंबर एम.एच. २३ पी. ६१४१ असा आहे. या गाडीची खात्री केली असता ती चोरीची असल्याचे समोर आले आहे. गाडी चोरी प्रकरणी शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत

## गोडाऊन लागलेल्या आगीत नुकसान

बीड – शहरातील मांजरसुंबा रोड परिसरातील साई फर्निचर शॉपचे गोडाऊन आणि त्याशेजारील पुट्टा खरेदी केंद्रास आज सकाळी १० वाजेच्या सुमारास मोठी आग लागली. या आगीमध्ये सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र, इलेक्ट्रॉनिक्स मशीन, फर्निचर जळून खाक झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाले. आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही. मांजरसुंबा परिसरात उमेश चौरे, बाळासाहेब चौरे, कशाब अनिल कुमार प्रसाद यांनी एक गोडाऊन भाड्याने घेतले आहे. यात इलेक्ट्रॉनिक मशीन आणि फर्निचरसह इतर साहित्य ठेवण्यात आले होते. आज सकाळी १० वाजेच्या सुमारास गोडाऊनमधून अचानक आगीचे लोट बाहेर पडू लागले. आग भडकल्याने नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले. आगीचे वृत्त कळताच पोलीसही घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन दलाने तातडीने पाण्याचा मारा सुरू करून आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत गोडाऊनमधील साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडून लाखो रुपयांचे नुकसान झाले. आजूबाजूला दाट लोकवस्ती होती. मात्र, अग्निशमन दलाने आग तातडीने आटोक्यात आणल्याने मोठी वित्तहानी झाली नाही.

## संवेदनशील मतदान केंद्राचा पोलिस अधिक्षकांनी घेतला आढावा

बीड – बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत निवडणुक दरम्यान प्रभाग क्रमांक २ मधील सरपंच पदाचे दावेदार असणा–या अँड.गणेश वाणी यांच्या शिट्टी चिन्ह असलेल्या बटणावर मशिनमध्ये फेव्हिस्टीक टाकल्याचा प्रकार घडुन आला आला होता. केंद्र प्रमुखांच्या फिर्यादीवरून नेकनुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे फेरमतदान करण्यात आले होते.आणि फेरमतदानात ४२ मते वाढली होती.

## बीड मतदार संघातील विकास कामांसाठी निधी

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघातील विविध भागात अल्पसंख्याक समाजाच्या विकासकामांसाठी ३ कोटी रुपयांचा निधी शुक्रवारी (दि.१५) मंजूर झाला आहे. या निधीतून शहर व ग्रामीण भागातील रस्ते, नाली, शहरातील जैन मंदिर परिसरातील विकासकामे, ख्रिश्चन समाजाचे सभागृह होणार आहे. बीड मतदारसंघातील ५५ अंगणवाड्या स्मार्ट होणार आहेत. या विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.क्षीरसागर यांनी पाठपुरावा केला आहे. राज्य शासनाच्या अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत बीड मतदारसंघातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. त्यासाठी यापूर्वीच भरीव निधी मिळालेला आहे. आता आणखी ३ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून बीड शहरातील जालना रोड भागातील जैन मंदिर परिसरात संरक्षण भिंत, रस्ता होणार आहे. तसेच, धानोरा रोड परिसरात ख्रिश्चन समाजाचे भव्य असे सभागृह बांधकाम होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील रस्ते, नालीसह इतर विकासकामे मार्गी लागतील.

# जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी घोटाळ्यात सहकार सचिवांना नोटीस

**बीड । प्रतिनिधी**

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड येथे ठेवीदारांच्या मुदत ठेवी परत न दिल्यामुळे सदरील क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्ष व संचालका विरोधा मध्ये शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड येथे ड.संतोष अप्पासाहेब जगताप यांनी कलम १२०- ब, ४०६, ४०९, ४२० व महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्था मधील हितसंबंधाचे संरक्षण) अधिनियमन १९९९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नेकनूर व वाशी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झालेला आहे. सहा महीने उलटले, परंतु गुन्हा दाखल होऊनही ठेवीदारांच्या ठेवी परत करण्या संबंधात कुठलीच कारवाई करण्यात आलेली नाही. न्याय हक्कासाठी ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मार्गदर्शक अशोकराव हिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष आप्पासाहेब जगताप, डॉ.अरविंद सखाराम काकडे व इतर ठेवीदाराने नरसिंह एल. जाधव यांच्या मार्फत रिट याचिका क्रमांक २७३४/२०२४ मा.उच्च न्यायालय खंडपीठा मध्ये दाखल केली असून त्यामध्ये सदरील जिजाऊ मासाहेब मल्ट्रीस्ट्रेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी यांच्या कारभाराची संपूर्ण चौकशी करून ठेवीदाराच्या ठेवी परत करण्याचे निर्देश प्रतिवादीला देण्यात यावे अशी विनंती केली आहे. सदरील रिट याचिकेची सुनावणी दि.११/०३/२०२४ रोजी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे झाली असता सदरील प्रकरणात प्रतिवादी १. सचिव सहकार मंत्रालय भारत सरकार, २. अतिरिक्त सचिव सहकार मंत्रालय भारत सरकार, ३. केंद्रीय निबंधक मल्टीस्टेट कोऑपरेटीव सोसायटी ४. गवर्नर रिझर्व बँक ऑफ इंडिया ५. जिल्हाधिकारी बीड यांना नोटीस काढून याचिकेची पुढील सुनावणी दि. १०/०४/२०२४ रोजी ठेवण्यात आलेली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने अॅड. नरसिंह जाधव यांनी काम पहिले त्यांना अॅड. सोनाली गणेश सोमवंशी व अॅड. गौरव एस. खांडे यांनी सहकार्य केले. तसेच शासनच्या वतीने सरकारी वकील एस. आर. यादव यांनी काम पहिले.

## साठवण तलाव जलवाहिनी योजेनेस प्रशासकीय मान्यता -आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**



उजनी प्रकल्पातील पाणी शिंपोरा येथून थेट जलवाहिनीद्वारे खुंटेफळ साठवण तलावात सोडण्याच्या कामाचे आज कार्यारंभ आदेश पारित झाल्यामुळे लवकरच या कामाला सुरुवात होऊन आष्टी तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असल्यामुळे या कामासाठी आपण गेली अनेक वर्ष प्रयत्नशील होतो त्या प्रयत्नांचे फलित आज प्राप्त झाले आहे त्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे , उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री यांचे आ. धस यांनी यांनी आभार मानले आहेत. आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी वरदान ठरणारा खुंटेफळ साठवण तलाव अर्थात आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ ही बहुप्रतिक्षित. बहुचर्चित असून त्यातील थेट जलवाहिनी कामाची प्रशासकीय मान्यता आदेश निघाल्यामुळे आपल्या कित्येक वर्षाच्या तपश्चर्येला फळ आले असून सुमारे ११०८ कोटी रु. किमतीच्या योजनेमुळे आष्टी तालुक्यातील सतत दुष्काळाचे छायेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलाव हे अंतर ७२.३३ किलोमीटर असून येथून खुंटेफळ साठवण तलावापर्यंत बंदिस्त जलवाहिनी २३६० मिलिमीटर व्यासाची असून या योजनेसाठी शिंपोरा, कर्जत आणि राशीन या तीन ठिकाणी पंप हाऊस निर्माण करण्यात येणार आहेत. मराठवाड्याच्या हक्काचे ५.६८ टीएमसी पाण्यापैकी सध्या १.६८ टीएमसी पाणी मिळणार असल्यामुळे या जलवाहिनीद्वारे येणाऱ्या पाण्या मुळे आष्टी तालुक्यातील ८१४७ हेक्टर एवढ्या क्षेत्राला पाणी उपलब्ध होणार आहे गेल्या अनेक वर्षापासून प्रतिक्षित असलेल्या या थेट पाईपलाईनच्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आल्यामुळे . महाराष्ट्र राज्याचे विकासाभिमुख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री यांचे आमदार धस यांनी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या वतीने जाहीर आभार मानले आहेत. लवकरच या कामाची सुरुवात होणार आहे असेही त्यांनी शेवटी सांगितले. या जलवाहिनी कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आल्याची माहिती मिळताच आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

## आ.आजबे यांच्या प्रयत्नातून जलवाहिनीचा योजनेस मान्यता

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारी व महत्त्वाकांक्षी असलेली योजना शिंपोरा ते खुंटेफळ योजनेच्या कामाचा कार्यारंभ आदेश राज्य सरकारच्या वतीने काढण्यात आला आहे त्यामुळे खुंटेफळ साठवण तलावाच्या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरुवात होणार असून यासाठी आपण वेळोवेळी सर्वांना बरोबर घेऊन राज्य सरकारकडे पाठपुरावा केला असल्यामुळे आज त्याचे फलित म्हणून प्रत्यक्ष कार्यारंभआदेश निघाल्याबद्दल आपण मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस कृषी मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब यांचे जाहीर आभार मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या वतीने मानत आहोत असे आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. उजनी प्रकल्पातील पाणी शिंपोरा येथून थेट जलवाहिनीद्वारे खुंटेफळ साठवण तलावात सोडण्याच्या कामाचे आज कार्यारंभ आदेश पारित झाल्यामुळे लवकरच या कामाला सुरुवात होऊन आष्टी तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असल्यामुळे या कामासाठी आपण व मतदार संघातील सर्वच आजी-माजी आमदार यांनीही गेली अनेक वर्ष प्रयत्न केले आहेत त्याचेच फलित आज प्राप्त झाले आहे याबाबत अधिक माहिती देताना ते पुढे म्हणाले की, उजनी तलावातील शिंपोरा ते खुंटेफळ ही थेट पाईपलाईन योजना कामासाठी आपण आपल्या कालावधीमध्ये प्रयत्न केले आहेत या अगोदर ही योजना दुसऱ्या पद्धतीने होती परंतु शिंपोरा ते खुंटेफळ साठी आपण वेळोवेळी आग्रह धरून ही योजना मंजूर करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत याचा आज मनस्वी आनंद होत आहे. खुंटेफळ साठवण तलाव आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ ही बहुप्रतिक्षित असून त्यातील थेट जलवाहिनी कामाचे कार्यारंभ आदेश निघाला.

# बीड लोकसभा मतदार संघासाठी १३ मे ला मतदान

**बीड । प्रतिनिधी**

देशात १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. सर्व राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये दिनांक १९ एप्रिल ते १ जून २०२४ या कालावधित एकूण सात टप्प्यांमध्ये मतदान पार पडणार असून ४ जून २०२४ रोजी निवडणुकीचा अंतिम निकाल जाहीर होणार आहे आणि लोकसभा मतदान प्रक्रिया सहा जूनला संपणार. महाराष्ट्रात १९ एप्रिल ते २० मे दरम्यान पहिल्या ५ टप्प्यांमध्ये निवडणुका घेण्यात येणार असून चौथ्या टप्प्यात ३९ बीड लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होईल. केंद्रीय निवडणूक आयोगाच्यावतीने नवी दिल्लीतील विज्ञान भवनात आज पत्रकार परिषद घेवून १८ व्या लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. मुख्य निवडणूक अधिकारी राजीव कुमार यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि डॉ.सुखबीर सिंह संधू यावेळी उपस्थित होते. निवडणूक कार्यक्रमांच्या या घोषणेमुळे देशात आजपासून आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. महाराष्ट्रातील ४८ लोकसभा जागांसाठी एकूण पाच टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येणार आहे. १९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यात राज्यातील एकूण ५ लोकसभा मतदार संघांसाठी निवडणुका पार पडणार आहेत. दुस-या टप्प्यात २६ एप्रिल रोजी राज्यातील ८ मतदार संघांसाठी निवडणुका घेण्यात येणार आहेत. ७ मे रोजी तिस-या टप्प्यात राज्यातील एकूण ११ मतदार संघांसाठी, १३ मे रोजी चौथ्या टप्प्यात तर २० मे रोजी राज्यातील उर्वरित १३ मतदार संघांसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. चौथ्या टप्प्यातील मतदानात ३९ बीड मतदार संघातही मतदान होईल. चौथ्या टप्प्यात बीडसह नंदुरबार जळगाव रावेर जालना छत्रपती संभाजी नगर मवाळ पुणे शिरूर अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघातही मतदान होईल. देशात १३ मे रोजी चौथ्या टप्प्यात १० राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण ९६ लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी १८ एप्रिल रोजी अधिसूचना जारी होणार आहे. या टप्प्यात बीडमध्येही मतदान होईल.

१ कोटी ८४ लाख मतदार (वयाची १८ वर्षे पूर्ण झालेले ) देशात प्रथमच मतदाते

१८ ते २९ वर्ष वयोगटातील २१ कोटी ५० लाख मतदार

देशात ८५ वर्षापेक्षा जास्त वयोगटातील ८२ लाख मतदार

१०० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील २ लाख मतदार

८५ वर्षावरील व ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगता असणाऱ्या व्यक्तींसाठी देशात प्रथमच घर जावून मतदान

१२ राज्यात महिला मतदारांचे प्रमाण प्रति १ हजार पुरुषांच्या तुलनेत १ हजारापेक्षा जास्त. देशात १ हजार पुरुषांमागे सरासरी ९४८ महिला मतदार

निवडणूक यंत्रणेसमोर ही चार आव्हान

बळाचा प्रयोग(मसल पावर), पैशांचा वापर (मनी पावर), चुकीची माहिती (मिस इन्फॉर्मेशन) आणि माध्यम समन्वय समितीच्या नियमांचे उल्लंघन ही निवडणूक यंत्रणेसमोरील महत्वाची आव्हाणे असून यावर मात करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्याचे राजीव कुमार यांनी सांगितले.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५, संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com